मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विधानसभेसाठी उच्चांकी मतदान वाढवा..., महापालिका निवडणुकांत उमेदवारी मिळवा

**तुमच्या प्रभागातून विधानसभेला उच्चांकी मतदान करुन घ्या, अशी थेट ऑफर : स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका 2022 पासून रेंगाळलेल्या आहेत.**

**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका 2022 पासून रेंगाळलेल्या आहेत. आता, 2024 मध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर 2025 अखेरपर्यंत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद आणि महापालिका निवडणूक टप्प्याटप्प्याने होणार आहे.पुढील दोन वर्षे निवडणुकांचा हंगाम सुरू राहणार आहे. याचाच उपयोग राजकीय पक्षांकडून विधानसभेच्या प्रचारासाठी पद्धतशीरपणे करून घेतला जातो आहे. महापालिकेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना तिकिटाचे गाजर दाखवून काम करून घेतले जात आहे. उमेदवारी पाहिजे, तिकीट पाहिजे... मग, तुमच्या प्रभागातून विधानसभेला उच्चांकी मतदान करून घ्या, अशी थेट ऑफर सुरु आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदान करून घेण्याची जबाबदारी त्या-त्या प्रभागातील माजी नगरसेवकांसह इच्छुक उमेदवारांवर टाकण्यात आली आहे. ज्या ठिकाणी माजी नगरसेवक काही कारणांवरून नाराज असतील त्याठीकाणी पर्याय म्हणून धनाड्य अन् तगडा जनसंपर्क असलेला इच्छुक उमेदवार उभा केला जात आहे. त्याच्याकड़े त्या-त्या प्रभागातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठीची जबाबदारी दिली आहे.



## विधानसभेसाठी नगरसेवकांचीच तयारी

» स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबल्याने तिन्ही मतदारसंघातून काही नगरसेवकच आमदारकीसाठी तयारी करत आहेत. राज्यातील राजकीय समीकरणे बदलली आहेत. सत्तेत शिवसेनाही आहे आणि राष्ट्रवादीही आणि विरोधात शिवसेनाही आहे आणि राष्ट्रवादीही आहे. अर्थात शिवसेनेत जसे दोन गट पडले आहेत. तसेच राष्ट्रवादीतही दोन गट पडलेले आहेत. त्यामुळे आमदारकीसाठी इच्छुकांना उमेदवारी/तिकीट मिळवण्यासाठी मोठी संधी आहे. त्यामुळे अनेकजण या पक्षातून त्या पक्षात जात आहेत. अनेक नगरसेवकांना विधानसभा लढविण्यासाठी पक्षाचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

## सोसायट्या टार्गेटवर

» विधानसभेच्या निवडणुकांसाठी प्रत्येक प्रभागातील सोसायट्या टार्गेट केल्या जात आहेत. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी त्या-त्या प्रभागातील इच्छुकांना हाताशी धरून सोसायट्यांमध्ये भेटी-गाठी देऊन विविध कामांचे आश्वासन दिले जात आहे. मात्र शहरात काही ठिकाणी मूलभुत प्रश्नांसाठी नागरिकांना वेट अॅन्ड वॉच करावे लागत असल्याने नाराजी आहे. अंतर्गत रस्ते, पाणी, वीज, कचरा अशा विविध समस्या घेऊन काही ठिकाणी उपोषण तर काही ठिकाणी आंदोलन केली जात आहेत.

## अशांना उमेदवारी मिळणार नाही

» ज्या प्रभागातून मतदानाची टक्केवारी कमी असेल अशांना महापालिका निवडणुकीत उमेदवारी दिली जाणार नाही, असे राजकीय पक्षांनी जाहीर केल्याने इच्छुक, माजी नगरसेवक, कार्यकर्ते कामाला लागले आहेत. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रत्येक घरात जाऊन आमच्या पक्षाला, नेत्याला मतदान करा अशी विनवणी इच्छुकांकडून केली जात आहे.

# निळ्या पूररेषेतील बांधकामांवर कारवाईला स्थगिती, शंकर जगताप यांच्या प्रयत्नांना यश

**शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विनंतीवरुन झालेल्या या निर्णयामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवीतील पवना नदीलगतच्या निळ्या पूररेषेअंतर्गत असलेल्या निवासी आणि व्यावसायिक बांधकामांवरील कारवाईस अखेर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह मंगळवारी स्थगिती दिली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विनंतीवरून झालेल्या या निर्णयामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



शंकर जगताप यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, दरवर्षी नदीला पूर आल्यानंतर नदीपात्रा लगतच्या भागात पुराचे पाणी शिरते. त्यामुळे तेथील रहिवाशांना स्थलांतरित करावे लागते. पुराचा धोका असल्यामुळे निळ्या पूररेषेतील बांधकामामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला होता. या पार्श्वभूमीवर भाजपच्या शिष्टमंडळाने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी तातडीने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा करीत सदर कारवाई तातडीने स्थगित करण्याची विनंती केली.

विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आजच्या बैठकीनंतर महापालिका प्रशासनाने कारवाईला स्थगिती दिली असून त्यामुळे निळ्या पूररेषेत येणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या बैठकीस माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, सुरेश भोईर, शारदाताई सोनावणे, राजू सावळे यांच्यासह सांगवी परिसरातील सर्व नागरिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योगातील, अनुचित प्रथा व गुंडगिरी प्रवृत्तीमुळे माथाडी कायदा अडचणीत : इरफान सय्यद

**माथाडी कायदा अडचणीत असल्याचे मत कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांनी व्यक्त केले.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगातील, अनुचित प्रथा व गुंडगिरी प्रवृत्तीच्या घटकांमुळे (माथाडी कायदा अडचणीत असल्याचे मत कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांनी व्यक्त केले.

कष्टकरी गोरगरीब जनतेला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती निमित्त चिंचवड येथील अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्याला महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



संघटनेचे कार्याध्यक्ष परेश मोरे, सरचिटणीस प्रवीण जाधव, उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, सचिव सर्जेराव कचरे, मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष पांडुरंग कदम रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश कंठाळे, संघटनेचे खजिनदार नागेश व्हनवटे ¸गोरक्षनाथ दुबाले,¸ बबन काळे,¸ पांडुरंग काळोखे ¸ ,संपत मांढरे, ¸ श्रीकांत मोरे, ¸ अशोक साळुंखे¸,बबन काळे, समर्थ नाईकवाडे,अमित पासलकर ¸ अविनाश जांभळे ¸ नाना नाईकवाडे¸ ज्ञानेश्वर घनवट,¸ गिरीश देशमुख ¸,चंद्रकांत पिंगट, ¸ सोमनाथ फुगे, ¸ सोपान गाडगे ¸, सतीश शिंदे,¸ धुळा शेंडगे ¸,रोशन दोलताडे,¸ सुनिल माने ¸, ज्ञानदेव पाचपुते ¸ कैलास तोडकर ¸, जयराम केगार ¸,आयुष शिंदे ¸ रत्नाकर भोजने उपस्थित होते.

आज खऱ्या अर्थाने साहेबांच्या विचारांना प्रमाण मानून कष्टकरी माथाडी ¸ हमाल मापडी कामगाराच्या करिता कार्य करणारे सरकार राज्यात प्रस्थापित झाले आहे. कायद्यात सुधारणा करण्यासाठी आणलेले विधेयक व त्या विधेयकामध्ये सुधारणा करण्यासाठी काही सूचना माथाडी कामगार, संघटना यांना मागविण्यात आल्या व त्याच अनुषंगाने कामगारांनी / संघटनांनी असमाधान व्यक्त केल्यानंतर सदरील विधेयक थांबवून त्यावर चिकित्सा समिती नेमण्यात आली. उद्योग टिकले तरच कामगार टिकेल, असेही सय्यद म्हणाले.

# शैक्षणिक शुल्काची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश

## महाविद्यालयांत विद्यार्थ्यांकडून प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आणि अन्य शुल्क सक्तीने वसुल केले जात होते

**पुणे | प्रतिनिधी**

अनेक महाविद्यालयांत विद्यार्थ्यांकडून प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आणि अन्य शुल्क सक्तीने वसुल केले जात होते. होते. त्यामुळे लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांची आर्थिक लूट होत होती. राज्यातील अनेक महाविद्यालयांत विद्यार्थ्यांकडून प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आणि अन्य शुल्क सक्तीने वसुल केले जात होते. होते. त्यामुळे लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांची आर्थिक लूट होत होती. ती रोखण्यासाठी शिक्षण क्षेत्राशी संबंधित शुल्काची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश उच्च तंत्रशिक्षण आणि उच्च शिक्षण संचालकांनी दिले आहेत.



### निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश

» राज्याचे उच्च तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर म्हणाले, "राज्यातील सर्व जिल्ह्यातील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अनुदानित व विनाअनुदानित तंत्रशिक्षण संस्था, महाविद्यालयांचे शुल्क निश्चित केले जाते. त्यानुसार प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना शुल्क घेणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रम निहाय शुल्काचा तपशील संकेतस्थळ आणि जाहीर फलकांवर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित विभागीय सहसंचालकांना दिले आहेत."

> विद्यापीठातील शुल्क निर्धारण समितीद्वारे राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्न अनुदानित, विनाअनुदानित खासगी महाविद्यालयांची शुल्क निश्चिती केली जाते. दरवर्षी मंजूर शुल्काची संपूर्ण माहिती विद्यार्थी व पालकांना करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व महाविद्यालयांच्या संकेतस्थळ, जाहीर फलकांवर प्रसिद्ध केले जात नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेत या संदर्भात आदेश देण्यात आले आहे.
>
> **- डॉ. शैलेंद्र देवळाणकर, राज्याचे उच्च शिक्षण संचालक.**

राज्यातील सर्व महाविद्यालयांची शुल्क निश्चिती विद्यापीठांच्या माध्यमातून केली जाते. तसेच अभियांत्रिकी, विधी, व्यवस्थापन आणि औषधनिर्माणशास्त्र शिक्षण संस्थांचेदेखील शुल्क निश्चित केले जातात. परंतु काही महाविद्यालयांकडून प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आणि अन्य शुल्क सक्तीने वसुली करत होते. त्यामुळे लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांची आर्थिक लूट होत होती. या संपूर्ण शुल्काची माहिती संबंधित विद्यापीठे, महाविद्यालये आणि तंत्रशिक्षण संस्थांच्या संकेतस्थळ आणि फलकांवर प्रसिद्ध करण्याची मागणी केली जात होती. यासंदर्भात पुणे मिररने सर्वप्रथम बातमी छापली होती. अखेर याची गंभीर दखल घेत उच्च तंत्रशिक्षण संचालक विनोद मोहीतकर आणि उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी शिक्षण शुल्काची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.

यासंदर्भात दिपू फाउंडेशनचे अमर एकाड म्हणाले, "पालक आणि विद्यार्थ्यांच्या आर्थिक लूट आणि संबंधित महाविद्यालयांवर कारवाई संदर्भात आम्ही पाठपुरावा केला होता. आमच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर उच्च तंत्रशिक्षण आणि उच्च शिक्षण संचालकांनी आदेश दिले. या निर्णयामुळे लाखो विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळेल."

'शुल्क नियंत्रण कायदा.' विद्यार्थी-पालक व सामाजिक संस्थांनी वेळोवेळी शाळांच्या मनमानी शुल्कवाढी विरोधात आवाज उठविल्यानंतर सरकारने 'शुल्क नियंत्रण कायदा' केला. हा कायदा येऊन काही वर्षे उलटली असली तरी शाळांच्या शुल्कवाढीला कुठलाच पायबंद बसला नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या जीवाला धोका असल्याचा कॉल

## फोन करणारा पिंपरी चिंचवड पोलिसांच्या ताब्यात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवाला धोका असून त्यांना वाचवा, अशा आशयाचा कॉल एका अभियंत्याने आपत्कालीन नियंत्रण कक्षाला केला. त्यानंतर राज्य पोलीस दलात एकच खळबळ उडाली. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवघ्या काही मिनिटातच संबंधित तरुणांना ताब्यात घेतले असून त्याच्याकडे कसून चौकशी सुरू आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज पुणे दौरा नियोजित होता. मेट्रोसह एकूण १२ प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन त्यांच्या हस्ते संपन्न होणार होते. मात्र, पुणे शहर परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे मोदी यांचा आजचा दौरा रद्द करण्यात आला आहे.

दरम्यान, आज गुरुवार (दि.२६) सकाळी एका अभियंता तरुणाने "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाचवा..., त्यांना मदत करा", असा कॉल आपत्कालीन नियंत्रण कक्षाला केला. या कॉल नंतर राज्य पोलीस दलात एकच खळबळ उडाली. तांत्रिक तपासाद्वारे हा तरुण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील थेरगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, काही मिनिटातच वाकड पोलिसांनी बस थांब्यावर बसची वाट पाहत असलेल्या तरुणाला ताब्यात घेतले. तरुण मूळचा उदगीर येथील असून तो थेरगाव येथे त्याच्या मित्राकडे आला होता.

अभियंता तरुणाने असा कॉल का केला. तसेच, त्याच्याकडे नेमकी काय माहिती आहे, याची कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांसह राज्य दहशतवाद विरोधी पथकाने देखील या कॉलची गंभीर दखल घेतली असून त्याच्याकडून देखील समांतर चौकशी सुरू आहे.

# पोर्शे कार अपघातानंतर केलेले कारनामे भोवणार

## गुन्ह्यांत कलमवाढ! अल्पवयीन आरोपीचा पाय खोलात

**पुणे | प्रतिनिधी**

पबमध्ये मद्यपान करून सुसाट महागडी मोटार चालवत दोघांच्या मृत्यूस जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन मुलावर येरवडा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात कलमवाढ करण्यात आली आहे. रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी पुराव्यात छेडछाड, कट रचणे, खोटे दस्ताऐवज तयार करणे आणि नमुने बदलण्यासाठी डॉक्टरांना लाच दिल्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमासह विविध कायद्यांनुसार मुलावर कारवाई होणार आहे.



अपघात झाल्यापासून त्याच्या तपासातील अनेक टप्प्यांची माहिती देणारा पुरवणी अहवाल गुरुवारी (ता. २६) पोलिसांनी बाल न्याय मंडळास (जेजेबी) सादर केला. त्यात पोलिसांनी वाढविलेली कलमे नमूद करण्यात आले आहेत. पबमध्ये मद्यपान करून सुसाट महागडी मोटार चालवत एका अल्पवयीन मुलाने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिली होती. या अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता. कल्याणीनगर येथे १९ मेला मध्यरात्री अडीचच्या सुमारास हा अपघात झाला होता. दोघांच्या मृत्यूस जबाबदार ठरलेल्या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेत जेजेबीमध्ये हजर केले होते. त्यानंतर काही दिवसांना मुलाला जामीन मंजूर करण्यात आला होता.

आरोपी अतुल घटकांबळे यांच्यामार्फत तीन लाख रुपयांची लाच डॉ. हाळनोर याने स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने मुलाविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार पुरवणी अहवाल जेजेबीमध्ये सादर करण्यात आला आहे. रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी ससूनमधील डॉक्टरांसह इतरांवर दाखल असलेले सर्व कलमे मुलावर देखील दाखल करण्यात आले आहेत. मुलाने त्याचे वडील व बांधकाम व्यावसायिक विशाल सुरेंद्रकुमार अग्रवाल आणि आई शिवानी विशाल अग्रवाल यांच्यासह ससून रुग्णालयातील वॉर्ड नंबर ४० मध्ये आरोपी डॉ. श्रीहरी हाळनोर यांना आरोपी अमर गायकवाड व अश्पाक मकानदार यांच्यामार्फत लाचेची प्रलोभने दिली. त्यानंतर ससूनचे अधिष्ठाता अजय तावरे याच्या सांगण्यावरून सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यातील महत्त्वपूर्ण पुरावा असलेले स्वतःचे रक्त बदलून त्याचे शिवानी अग्रवाल यांच्या रक्ताचा नमुना दिला. आरोपी अतुल घटकांबळे यांच्यामार्फत तीन लाख रुपयांची लाच डॉ. हाळनोर याने स्वीकारल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने मुलाविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार पुरवणी अहवाल जेजेबीमध्ये सादर करण्यात आला आहे. रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी ससूनमधील डॉक्टरांसह इतरांवर दाखल असलेले सर्व कलमे मुलावर देखील दाखल करण्यात आले आहेत.

# इंद्रायणी नदी पुन्हा एकदा फेसाळली

## नदी प्रदूषणाकडे सर्वांचे दुर्लक्ष : भाविक व नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी, सोशल मीडियावर संताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदी येथून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीला प्रदूषणामुळे ग्रासले आहे. हे ग्रहण सुटता सुटत नसल्याने भाविक व नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. गेल्या दोन महिन्यांत अनेक वेळा प्रदूषणाने नदी फेसाळली असून यात बुधवारी (दि. २५) पुन्हा इंद्रायणी नदीचे पाणी फेसाळले.

पुलावर फेसाळलेली नदी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. तसेच नागरिकांनी सेल्फी घेत सोशल मीडियावर आळंदीतील नदी प्रदूषणाचा विषय ऐरणीवर आणला. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीएकडून इंद्रायणी सुधार प्रकल्प हाती घेण्याच्या



घोषणा कागदावरच राहिल्या आहेत.

आळंदी-देहूसह पुण्यातील नद्या प्रदूषणमुक्त होण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिक, भाविक सतत म्हणत असतात. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीचे पावित्र्य जोपासण्यास तत्काळ उपाय योजना हाती घेण्याची मागणी नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश रहाणे, आळंदी जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील यांनी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई- मेल द्वारे इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त व्हावी, यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नद्या प्रदूषण मुक्त होण्यासाठी निवडणूक आचार संहिता लागू होण्यापूर्वी प्रभावी निर्णय घेऊन विकास कामांना मंजूरी द्यावी. सांडपाणी थेट नदीत जाऊ नये यासाठी इंद्रायणी नदीच्या दुतर्फा नाली विकसित करण्याचे काम सुरू व्हावे अशी मागणी आळंदीकरांनी केली आहे. या वर्षामध्ये वारंवार फेसाळणारी इंद्रायणी आणि प्रदूषणामध्ये होणारी वाढ लक्षात घेता स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. केवळ आश्वासन आणि पाहणी दौरा करून कोणताही प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे प्रशासनावर कोणताही विश्वास राहिला नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या संदर्भात आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे म्हणाले, नदीचे प्रदूषण रोखण्यास उपाययोजना केल्या जात आहेत. यासाठी प्रस्ताव देण्यात आला आहे. लवकरच पिंपरी-चिंचवड आयुक्त अध्यक्ष असलेल्या समितीची बैठक होणार आहे.

# अंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत पीसीसीओई अजिंक्य

## मुलींच्या गटात आळंदी येथील एमआयटी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत मुलांच्या गटात पीसीसीओईने तर मुलींच्या गटात आळंदी येथील एमआयटी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजयी संघांना बुधवारी (दि.२५) पीसीईटीचे संस्थापक अध्यक्ष कै. शंकरराव बाजीराव पाटील व कै. श्रीमती लीलाताई शंकरराव पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ फिरता चषक पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, एसडीडब्ल्यू डॉ. पद्माकर देशमुख पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. ज्ञानेश्वर चिमटे यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने (पीसीसीओई) या स्पर्धेचे प्रायोजकत्व स्वीकारले




होते. पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष पाचारणे यांनी नियोजन केले होते. दि. २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान या आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन (मुले व मुली) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धेमध्ये मुले गटात पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी संघाने इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर सायन्स, ताथवडे संघाचा ३/२ अशा फरकाने पराभव करत अजिंक्यपद पटकावले. मुली गटामध्ये एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (आळंदी) संघाने विद्या प्रतिष्ठान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (बारामती) संघाचा २/० फरकाने पराभव करत विजेतेपद पटकाविले. स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील ५५ महाविद्यालयाच्या मुले संघाने व २४ महाविद्यालयाच्या मुली संघांनी सहभाग घेतला होता. मुलांच्या अंतिम सामन्यात पीसीसीओई, निगडी महाविद्यालयाचे यश साळुंखे, ओम शेळके, वेदांत देसाई व रितेश निहाल यांनी उत्कृष्ट खेळ करून विजेतेपद मिळविले.

दरम्यान सोमवारी (दि.२३) स्पर्धेचे उद्घाटन पीसीईटीच्या उपाध्यक्ष श्रीमती पद्माताई भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्योजक नरेंद्र लांडगे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष डॉ. महेंद्र अवघडे, सचिव डॉ. उमेशराज पनेरू आदी उपस्थित होते.

### स्पर्धेचा अंतीम निकाल

» **मुले विभाग विजयी :- पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (निगडी); उपविजयी :- इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर सायन्स (ताथवडे); तृतीय क्रमांक :- डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (आकुर्डी)**

» **मुली विभाग विजयी :- एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, (आळंदी); उपविजयी :- विद्या प्रतिष्ठान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (बारामती); तृतीय क्रमांक :- पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय (रावेत).**

यशस्वी संघांचे व स्पर्धकांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# ‘ससून’मधील गोंधळानंतर राज्य सरकार सावध!

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय अधीक्षकांच्या नियुक्तीचे अधिष्ठात्यांना असलेले अधिकार काढून घेण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय अधीक्षकांच्या नियुक्तीचे अधिष्ठात्यांना असलेले अधिकार काढून घेण्यात येणार आहेत. अधीक्षकांची नियुक्ती शासन स्तरावरून केली जाणार आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांत आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात झालेल्या गैरप्रकारांमुळे हा निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते.



बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात गेल्या वर्षीपासून पाच वैद्यकीय अधीक्षक नेमण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक नेमण्याचे अधिकार वैद्यकीय महाविद्यालय तथा रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना आहेत. मात्र, या पदाच्या नियुक्तीसाठी राजकीय वशिलेबाजी केली जाते. अनेक जण अधीक्षकपदासाठी मोर्चेबांधणी करतात. यातून वैद्यकीय शिक्षण विभागाला वारंवार अर्ज करणे आणि विद्यमान अधीक्षकाच्या विरोधात तक्रारी करणे असे प्रकार सुरू होतात. याला कंटाळून अखेर अधीक्षक नेमण्याचे अधिकार अधिष्ठात्यांकडून काढून घेण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारच्या पातळीवर घेण्यात येणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### ससूनमधील गोंधळ कारणीभूत

» आपल्या मर्जीतील वैद्यकीय अधीक्षक नेमण्याची परंपरा ससूनमध्ये खूप वर्षांपासून कायम आहे. मात्र, गेल्या वर्षीपासून अधीक्षकपदाची संगीतखुर्ची सुरू झाली. अधिष्ठात्यांनी अधिकार हातात आहेत म्हणून अधीक्षक बदलण्यास सुरुवात केली. यामुळे वारंवार अधीक्षक बदलण्याचे प्रकार सुरू झाले. ससूनमधील गोंधळामुळे हा निर्णय घेतला जाणार असून, तो राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना लागू होईल.

### अंमलबजावणीबाबत साशंकता

» वैद्यकीय अधीक्षकपदी प्राध्यापकाची नियुक्ती करावी, असे आदेश आहेत. राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या नियमानुसार एकाच व्यक्तीकडे दोन पदे नसावीत. मात्र, अनेक प्राध्यापक हे विभागप्रमुख असल्याने त्यांच्याकडे अधीक्षकपद सोपविता येत नाही. याचवेळी नियमानुसार सहयोगी प्राध्यापकाकडे अधीक्षकपद देता येत नाही, असा तिढा निर्माण झाला आहे. त्यामुळे या नवीन निर्णयाची अंमलबजावणी राज्यभरात कितपत यशस्वी होईल, याबद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे.

राज्यात २५ वैद्यकीय महाविद्यालये असून, त्यात अधीक्षक हे पद अतिशय महत्त्वाचे असते. वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयाची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर असते. वैद्यकीय शिक्षण विभागाने नुकतेच सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना पत्र पाठवून विद्यमान अधीक्षकांची माहिती मागविली आहे. सध्याचे अधीक्षक राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या नियमांची पूर्तता करतात का, पूर्तता करीत नसल्यास नियुक्ती करण्याचे कारण काय, याविषयी माहिती मागविण्यात आली आहे. या पदाच्या नियुक्तीचे अधिकार आता राज्य शासन आपल्या हाती घेणार आहे. त्यामुळे अधीक्षक नियुक्तीचा अधिकार अधिष्ठात्यांना नसेल, असे सूत्रांनी सांगितले.

> राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय अधीक्षकपदांचा आढावा घेण्यात येत आहे. यामुळे याबाबत वैद्यकीय महाविद्यालयांना पत्र पाठवून माहिती मागविली आहे. प्रशासकीय बाब म्हणून हा आढावा सुरू आहे.
>
> **- राजीव निवतकर, आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग.**

# ‘आरटीओ’तील संपात मध्यस्थ तेजीत!

## नागरिकांकडून राजरोस जादा पैशांची लूट सुरु : अधिकारी बघ्याच्या भूमिकेत

**पुणे | प्रतिनिधी**

मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेला बेमुदत संप सुरूच आहे. या संपात पुण्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) बहुतांश कर्मचारी सहभागी झाल्याने कामकाज ठप्प झाले आहे. याचा फायदा मध्यस्थांनी घेतला असून, नागरिकांकडून जादा पैसे उकळण्याचे काम ते राजरोसपणे करीत आहेत.




पुण्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सुमारे ७५ कर्मचारी २४ सप्टेंबरपासून संपावर आहेत. या संपामुळे नवीन वाहन परवाना वितरण, वाणिज्य वाहनांची नोंदणी, वाहन परवाना नूतनीकरण, वाहन परवान्यावरील पत्ता बदलणे, वाहनाची मालकी हस्तांतरित करणे, वाहनावरील कर्जाचा बोजा उतरविणे यासह अनेक सेवा बंद आहेत. हा संप आरटीओतील मध्यस्थांच्या पथ्यावर पडल्याचे चित्र सध्या दिसत आहे. अनेक मध्यस्थ आरटीओमध्ये आलेल्या नागरिकांकडून जादा पैसे उकळून त्यांची कामे संपाच्या काळातही करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाज बंद असताना मध्यस्थांसाठी खास मार्गाने ते सुरू असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत.

पुणे आरटीओ कार्यालयातील सेवांसाठी दररोज सुमारे १ हजार ते १ हजार २०० नागरिक अर्ज करतात. या संपामुळे या नागरिकांची आरटीओतील काम खोळंबली आहेत. काही नागरिकांना तातडीने कामे पूर्ण करण्याची निकड असते. असे नागरिक आरटीओ कार्यालयात येत आहेत. कार्यालयात मदत कक्ष आहे मात्र, तिथे अनेक वेळा कर्मचारीच उपस्थित नसतो. कार्यालयात आलेल्या नागरिकांना हेरून मध्यस्थ त्यांचे काम करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यासाठी नागरिकांकडून अव्वाच्या सव्वा रक्कम ते घेत आहेत. याकडे आरटीओतील वरिष्ठ अधिकारी केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत आहेत.

> मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागणीवर अद्याप राज्य सरकारने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आमचा संप कायम आहे. पुण्यातील आरटीओ कार्यालयात दररोज सुमारे बाराशेहून अधिक नागरिकांच्या अर्जांवर कार्यवाही केली जाते. सध्या हे काम ठप्प झाले आहे.
>
> **- जगदीश कांदे, राज्य कार्याध्यक्ष, मोटार वाहन कर्मचारी संघटना.**